# 'अदानी'च्या व्याजमुक्त ईएमआय योजनेला मुदतवाढ

मुंबई, ता. २३ : ग्राहकांची वीजबिलांबद्दलची चिंता दूर करण्यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने आपली व्याजमुक्त ईएमआय सुविधा स्वीकारण्याची मुदत ३० ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे.

लॉकडाऊनमध्ये आलेल्या एकत्रित बिलांची थकबाकी भरण्यासाठी अदानीच्या ग्राहकांना तात्पुरती तीन हप्त्यांची (बिनव्याजी, विनादंड) सुविधा दिली आहे. ती स्वीकारण्याची मुदत २३ ऑक्टोबरपर्यंत होती; मात्र ग्राहकांच्या सोईसाठी तिला ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिल्याचे अदानी इलेक्ट्रिसिटी (मुंबई)चे मुख्य कार्यकारी अधिकारी कंदर्प पटेल यांनी सांगितले.